डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला
कृषि तंत्र विद्यालय, बुलडाणा.

सूचना का अधिकार

प्राचार्य
डॉ.एस.एम.जाधव
एम.एससी.पीएच.डी.(मृदा विज्ञान व कृषि रसायनशास्त्र)

दुरध्वनी क्र.९८५०३७३७६४
ईमेल : atsbuldana@gmail.com

जा.क्र./कृतविबु/५६५ /२०२५

दिनांक: ०४ /०२ /२०२५

## परीपत्रक

कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा येथील जनावरे बैल व गोऱ्हयांचा लिलाव शेतकऱ्याच्या हितार्थ शेती मशागतीकरीता दि.२०.०२.२०२५ ला सकाळी १०.०० वाजता कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा येथील प्रक्षेत्रावरील पशुसंवर्धन विभागात करणे आहे . तरी सोबतच्या जोडलेल्या पत्रातील अटी व शर्तीनुसार संबधीतांनी उपस्थीत रहावे.

प्राचार्य,
कृषि तंत्र विद्यालय, बुलडाणा

AnyScanner

# कृषि तंत्रविद्यालय,बुलडाणा येथील जनावराच्या लिलावासाठी नियम व अटी

पशुसंवर्धन विभाग , कृषि तंत्रविद्यालय,बुलडाणा येथे जनावराचा जाहीर लिलाव करण्यात येणार आहे. जनावरच्या लिलावाकरीता नियुक्त अधिकारी जनावराचा लिलाव करतील – लिलाव सुरू करण्यापुर्वी जनावराची पुर्ण माहीती जाहीर करतील व लीलावाच्या अटी समजवुन सांगतील –

१.)लिलावात बोली बोलण्या अगोदर अमानत रक्कम रु १०००/- अक्षरी एक हजार फक्त जमा करावी लागेल. कोणत्याही व्यक्तीस अमानत रक्कम भरल्याशिवाय लिलावामधे बोली बोलन्यास परवानगी देण्यात येणार नाही. एखादे व्यक्तिच्या नावे बोली पुर्ण झाल्यास व त्याने जनावरे घेण्यास नकार दिल्यास सदर अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.गुरांचा लिलाव शेतकऱ्याच्या हितार्थ असल्याने शेतकऱ्यांनी शेतजमिनीचा ७/१२ सोबत आनने आवश्यक आहे.

२.)लिलावात जनावरे /जनावर घेण्याची अनामत रक्कम त्या सर्वोच्च बोली धारकाने जनावरे /जनावर त्यांची संपुर्ण रक्कम भरल्यानंतरच परत करण्यात येईल.त्याचप्रमाणे अयशस्वी बोली बोलणाऱ्याची अनामत रक्कम लिलाव संपल्यानंतर परत करण्यात येईल.

३.)बोली बोलतांना बोलीची रक्कम कमीत कमी २००रु नी वढवावी लागेल.लिलावाची तिसरी फेरी पुर्ण झाल्यावर सर्वात जास्त बोली बोलणाऱ्याचे नाव जाहीर करून लिलावाची प्रक्रिया पुर्ण करण्यात येईल.

४.)ज्या व्यक्तीची बोली मंजुर झाली त्या व्यक्तिला मंजुर झालेल्या बोलीच्या किंमती एवढी पुर्ण रक्कम त्वरीत अदा करावी लागेल.लिलावात खरेदी केलेल्या जनावराची पुर्ण किंमत भरून संबधीत बोली धारकांना सदर जनावरे /जनावर ताबडतोब स्वताच्या ताब्यात घ्यावी लागेल व स्वखर्चाने न्यावी लागेल. सदर जनावराची कोणतीही जबाबदारी विभागाची वा लिलाव समितीची राहणार नाही. त्याची स्वर्वस्वी जबाबदारी मंजुर बोलीधारकाची राहील.बोलीधारकाने जनावरे /जनावर ताबडतोब स्वताच्या ताब्यात न घेतल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.व समिती मार्फत जनावरे /जनावर चा पुन्हा लिलाव करण्यात येईल.

५.)लिलावात जास्तीत जास्त बोली स्विकृत करणे अथवा न करणे तसेच अपेक्षेपेक्षा बोली कमी असल्यास संबधीत जनावर देण्याचा अथवा न देण्याचा सर्व अधिकार लिलाव समितीचा राहील.हया शिवाय लिलावात इतर बाबतीत लिलाव समिती अधिकाऱ्याचा निर्णय हा अखेरचा व बंधनकारक राहील.

६.)एकदा लिलावात विकत घेतलेले जनावर कोणत्याही सबबी दाखल परत घेतल्या जानार नाही. संबधीत बोली धारकाने जनावराचा ताबा न घेतल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

७.)लिलाव पुर्ण करण्याचा निर्णय तसेच कोणतेही कारण न दाखवता लिलाव रदद् करण्याचा अधिकार लिलाव समिती अधिकाऱ्यास राहील तसेच लिलावाव्दारे विकण्यात येणाऱ्या जनावरांची संख्या कमी अथवा जास्त करण्याचे अधिकार लिलाव समितीस राहील लिलाव समितीने दिलेल्या निर्णयावर कोनतीही अपील करता येणार नाही .बोली धारकांना हा निर्णय अखेरचा व बंधनकारक राहील.

लिलाव समितीच्या कामकाजामधे अडथळा आनने , आरडाओरड करणे किंवा दखल देणाऱ्यास लिलावातून बाद करण्यात येईल.व त्याची अमानत रक्कम जप्त करण्यात येईल.

SCAN AnyScanner

८.) लिलावात सर्वोच्च बोली बोलून जनावर /जनावरे खरेदी केलेल्या धारकास सदरहू जनावरे ताब्यात घेतांना ती जनावरे शेतीकामाकरीता /पाळण्याकरीता विकत घेत असुन कत्तलीसाठी वापर करणार नाही असे लेखी हमीपत्र लिहून दयावे लागेल.

९.)लिलावात विकत घेतलेले जनावरे बोली धारकाने २४.०० तासाच्या आत न घेतल्यास रू २००.०० /-खावटी म्हणून विभागात जमा करावी लागेल अन्यथा सदरहू बोली धारकाची रक्कम जप्त करण्यात येईल.

१०.) नाव नोदणी व अनामत रक्कम भरण्याची वेळ सकाळी १०.०० ते ११.०० वाजे पर्यत राहील.

११.)लिलावाचे स्थळ कृषि तंत्र विद्यालय, बुलडाणा, धाड रोड सागवान, बुलडाणा.

१२.)बोली धारकास शेती चा ७/१२ व आधार कार्ड सोबत असणे अनिवार्य आहे.

प्राचार्य,

कृ.त. वि. बुलडाणा.